


# पर्यटस्थळाचं वैभव लाभलेलं कृषी-उद्योगस्नेही ‘मधुक्षेत्र’



**नितीन कराळे**
प्रकल्प व्यवस्थापक,
(मो.नं. ७७७४०८९५१७)
बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र,
पिंपळगाव (बसवंत), ता. निफाड, जि. नाशिक

**बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्रात मधुमक्षिका पालन आणि संवर्धनाचा सर्वांगीण अभ्यासक्रम उपलब्ध आहे. येथे पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रात्यक्षिकांनाही प्राधान्य देण्यात येते. हा मधुमक्षिकेच्या उपयुक्ततेविषयी सचित्र माहिती देणारा परिसर आहे. तसेच विद्यार्थी, युवा आणि उद्योजकांना समग्र मार्गदर्शनही करण्यात येते.**

‘ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.’ संचलित व ‘पूर्वा केमटेक प्रा.लि.’ च्या सहकार्याने ‘बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र’ तसेच बसवंत गार्डनची स्थापना मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक येथे केली आहे. बसवंत गार्डनमध्ये आदर्श गाव सेवरगाव, जानोरी फ्लॉवर्स, द्राक्षाच्या विविध जातींची लागवड, बेदाणा प्रक्रिया उद्योग, फळप्रक्रिया उद्योग, बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राची उभारणी केली आहे.

हे सर्व प्रकल्प अत्याधुनिक आणि उत्कृष्ट पद्धतीने उभारलेले आहेत. नाविन्यपूर्ण पद्धतीने मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राची रचना केलेली आहे. मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्रामध्ये तीन दिवसीय व पाच दिवसीय मधमाशी पालन प्रशिक्षण देण्यात येत आहे. महिन्याच्या प्रत्येक दुसऱ्या व तिसऱ्या बुधवारी प्रशिक्षणाचे नियोजन केलेले असते. ज्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पूर्ण करून मधमाशी पालन हा व्यवसाय सुरू करायचा आहे त्यांना सर्व प्रकारचे तांत्रिक मार्गदर्शन केले जाते. तसेच या व्यवसायाकरिता लागणारे सर्व साहित्य उपलब्ध करून दिले जाते. खरं तर मधमाशी पालनाकडे महाराष्ट्रातील शेतकरी आणि एकूणच संबंधित यंत्रणेने पाहिजे त्या पद्धतीने लक्ष दिलेले नाही, त्यामुळे हा व्यवसाय पुढे गेलेला नाही. याचाच विचार करून मधमाशी पालनाबद्दल शहरी नागरिक, तरुण आणि शेतकरी यांना आकर्षित करण्यासाठी ‘बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्रा’ची उभारणी केली आहे.

**मधु-विचार मंथनाचा उपक्रम**

महाराष्ट्रात मधमाशी पालन व्यवसायापासून ग्रामीण भागात रोजगार निर्मिती व्हावी, या उद्देशाने प्रशिक्षण केंद्रामार्फत दोन वर्षांपूर्वी डिसेंबर २०१९ मध्ये ‘मधुक्रांती-२०१९’ हा तीन दिवसीय राज्यस्तरीय सेमिनार आयोजित करण्यात आला होता. यामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी, तरुण व मधमाशी पालकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. मान्यवर मधुतज्ञांनी उपस्थितांना मौलिक मार्गदर्शन केले. गतवर्षीही २८, २९, ३० ऑक्टोबर २०२० ला ‘मधुक्रांती-२०२०’ हा तीन दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन वेबिनार आयोजित केलेला होता. ‘कोविड’ संक्रमणामुळे असलेल्या बंधनांच्या पार्श्वभूमीवर, दूरसंवादाच्या स्वरुपात झालेल्या या तीन दिवसीय वेबिनारमध्ये महाराष्ट्रातील व बाहेरील राज्यांतील विषयतज्ञांनी मार्गदर्शन केले होते.

आता यंदाही दि. २१ ते २६ डिसेंबर दरम्यान ‘बसवंत हनी बी फेस्टिव्हल’चे आयोजन केले आहे. या अंतर्गत दि. २२ व २३ रोजी ‘मधुक्रांती-२०२१’ परिसंवाद होणार आहे. यावेळी देखील मधमाशी पालन क्षेत्रातील अभ्यासक उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

बसवंत मधमाशी उद्यानामध्ये फिरत असताना मधमाशीच्या उपयुक्ततेबद्दल अनेक बाबींचा खुलासा होतो. मधमाशीबद्दलच्या ज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात भर पडते.

मधमाश्यांच्या वसाहती, मधमाश्यांद्वारे प्रत्यक्ष फुलातून मकरंद आणि मध गोळा करण्याचे होणारे कार्य तसेच त्यांच्या एकूणच कार्याची प्रत्यक्ष पाहणी करता येते. शास्त्रीय पद्धतीने मध व इतर उत्पादने प्राप्त करण्यासाठी उपयुक्त असलेली साधने, मधप्रक्रिया प्रकल्प येथे बघावयास मिळतात. अशा प्रकारे उद्यानाद्वारे मधमाशीची संपूर्ण माहिती देणारा देशातील हा पहिलाच प्रकल्प असावा, असे मला वाटते.

पिंपळगाव बसवंत येथील बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र हे नाशिकपासून ३५ कि.मी. अंतरावर आहे. या उद्यानामध्ये सातेरी, मेलिफेरा, फुलोरी, ट्रायगोना व आग्या मधमाशीच्या संदर्भात शास्त्रोक्त पद्धतीने संपूर्ण माहिती दिलेली आहे तसेच या जातींच्या वसाहती सुद्धा प्रत्यक्ष बघावयास मिळतात. या उद्यानामध्ये मधमाशीच्या संदर्भात खूप वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. त्याचबरोबर मधमाशी हा विषय घेऊन वेगवेगळया प्रकारच्या प्राचीन संस्कृतीतील वस्तू व आधुनिक वस्तू विक्रीसाठी ठेवल्या आहेत.

मधमाशी उद्यानामधील विशेष आकर्षणे खालीलप्रमाणे आहेत–

स्वयंपूर्ण अशा आदर्श ग्रामव्यवस्थेचे मॉडेल ठरणारे सेवरगांव, परागीभवनासाठी हंगामानुरूप तसेच पिकांनुसार शेतात ठेवावयाच्या मधमाशी पेट्यांचा नियोजन आराखडा, पेंटिंग गॅलरी, मधमाश्यांचे अपार महत्त्व सांगणारा माहितिपट, लहान मुलांसाठी प्ले एरिया, आग्या मधमाश्यांचे संरक्षण आणि एकूणच मधमाश्यांच्या संवर्धनाचे महत्त्व सांगणारी शिल्पे, बांबू व हस्तकला वस्तूंचे संग्रहालय (म्युझियम) तसेच विविध लज्जतदार खाद्यपदार्थ उपलब्ध असणारे 'मधुबन फूड कोर्ट' आणि 'बसवंत कॅफे' यांसह अनेक आकर्षणांचा येथे समावेश आहे.

**ॲपियरी** : मधमाशी पालनाच्या प्रशिक्षणाकरिता व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मधमाश्यांचे प्रकार ओळखता यावेत याकरिता ॲपियरी तयार करण्यात आलेली आहे. सातेरी, मेलिफेरा, फुलोरी, ट्रायगोना या जातीच्या मधमाश्यांच्या वसाहती ॲपियरीमध्ये ठेवलेल्या आहेत.



* **फुलझाडे** : उद्यानामध्ये वेगवेगळ्या रंगीबेरंगी इनडोअर, आऊटडोअर फुलझाडांची लागवड केलेली आहे.

* **म्युझियम** : प्राचीन काळातील मुखवटे, खेळणी, बांबूपासून तयार केलेल्या वस्तू तसेच मधमाशी व मधमाशी पालन संदर्भातील वस्तू म्युझियममध्ये प्रदर्शित करण्यात आल्या आहेत.

* **सेल्फी पॉईंट** : मधमाशीची भव्य व आकर्षक प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. हा सेल्फी पॉईंट आलेल्या सर्व पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे.



* **मधुबन फूडकोर्ट** : बसवंत मधमाशी उद्यानातील मधुबन फूडकोर्टमध्ये मधापासून तयार केलेले वेगवेगळे खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत.

**मधमाश्यांविषयी समग्र माहितीचा स्रोत**

मधमाश्यांचे निसर्गातील व मानवी जीवनतील महत्त्व, मधमाश्या पालनाचा प्राचीन इतिहास, मधमाश्यांचा जीवनक्रम, श्रमविभागणी, खाद्याचा शोध याबद्दलचा तपशील येथे समजतो. यासाठी १०० ते १५० फूट लांबीचे टनेल बनविले असून, या टनेलमधून जात असताना मधमाश्यांच्या उत्पत्तीपासून आजपर्यंतची सर्व माहिती तसेच मधमाश्यांची जीवनशैली, प्रकार आणि उपयोग ही माहिती नाविन्यपूर्ण पद्धतीने मांडली आहे. या टनेलमधून जाताना मधमाश्यांचा संपूर्ण जीवनपट आपल्यासमोर उभा राहतो. तसेच मधाचे विविध प्रकार, शुद्ध मध ओळखण्याच्या पद्धती, मधमाश्यांपासून मधाव्यतिरिक्त मिळणारे आरोग्यदायी पदार्थ अशी सर्व माहिती प्रदर्शित करण्यात आलेली आहे.

मधमाशी हा सामुदायिक जीवन जगणारा समूहप्रिय कीटक असून तो आपला मित्रकीटक आहे. मधमाशी व वनस्पती यांच्यातील सहजीवनामुळे मानवाचे व वन्यजीवांचे कल्याण होते. त्याचबरोबर तो आदर्श पर्यावरण सेवकाची भूमिका पार पाडतो.

कृषी क्षेत्रात शत्रुकीटक व बुरशी यांचे नियंत्रण करताना मित्रकीटकांचा सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. याचे उदाहरण द्यायचे झाल्यास पूर्वी मधमाश्यांचे मोहोळ शेती परिसरात व जंगलांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात दिसायचे. परंतु याचे प्रमाण आता खूप कमी झाले आहे. शेती व्यवसायातून आर्थिक समृद्धी प्राप्त करून घेण्यासाठी निसर्गातील मोहोळांचे संरक्षण करणे व पाळीव मधमाश्यांचा पिकांमध्ये परागीभवनासाठी प्रभावी वापर करणे फार आवश्यक आहे.

**प्रशिक्षण केंद्राची उभारणी**

बसवंत मधमाशी उद्यानाबद्दल सखोल माहिती मिळाल्यानंतर, कोणालाही आपण देखील मधमाशी पालनाला प्रशिक्षणाद्वारे सुरवात करावी असे वाटेल. याचाच विचार करून फक्त पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष कार्यानुभवातून प्रशिक्षण द्यावे यासाठी या प्रशिक्षण केंद्राची स्थापना केलेली आहे. सातेरी व मेलिफेरा या जातीच्या मधमाश्यांचे पालन करण्यासाठी ३ ते ५ दिवसांचे प्रशिक्षण देण्याची सुविधा येथे उपलब्ध केली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये मधमाशीची प्रत्यक्ष हाताळणी, राणी माशीची निर्मिती, मधमाश्यांच्या वसाहतीचे विभाजन, मधमाश्यांचा परागीभवनासाठी वापर, मधाची काढणी, प्रक्रिया यासारख्या सर्व विषयांवर प्रशिक्षण देण्यासाठी सर्व यंत्रणा उभारली असून, समग्र प्रशिक्षण देण्यात येत आहे. महिन्यातील दुसऱ्या व तिसऱ्या बुधवारी प्रशिक्षणाचे नियोजन केलेले असते. तसेच ज्यांना हा व्यवसाय सुरू करायचा आहे त्यांना मधमाश्यांच्या वसाहती व इतर साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच त्यांना मध विक्री व्यवस्थेसाठी मदत करण्यात येईल.

**मधमाशी उद्योगासाठी सेवा-सुविधा**

मधमाशी पालन व्यवसायाला पुढे नेण्यासाठी आवश्यक त्या सर्व सेवा सुविधा निर्माण करून देण्याचा प्रयत्न बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राद्वारे होत आहे. शेतीमधील पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी परागीभवनाकरिता मधमाश्यांच्या वसाहती उपलब्ध करून दिल्या आहेत. मधमाशी पालनातील सर्व बाबींची माहिती देण्यासाठी मधमाशी पालनातून मिळणारे उत्पादन, विविध प्रक्रियायुक्त पदार्थ यांचे म्युझियम उभारले असून, त्यातून देश-विदेशातील मध व आनुषंगिक उत्पादनांची माहिती मिळेल. शहरी भागातील समाजाला मधमाश्यांची माहिती देण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये मधमाश्यांबद्दलची आवड व ज्ञान वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.



ज्याप्रमाणे मधमाशी स्वत:चे कार्य करत असताना इतरांच्या उपयोगी पडते आणि कृषी उत्पादनात वाढ करून, शेतकऱ्यांच्या आयुष्यात गोडवाही निर्माण करते; तो आदर्श आपणही घ्यावा; असा विचार 'पूर्वा केमटेक' व 'ग्रीनझोन ॲग्रोकेम' यांनी केला. या माध्यमातून मधमाशी पालन व्यवसायाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यासाठी 'बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्रा'ची उभारणी केली. याद्वारे शेतकरी आणि एकूणच समाजाला अर्थार्जनाचे माधुर्य लाभावे, याच मुख्य उद्देशाने या सर्व प्रकल्पाची उभारणी करून प्रयत्न सुरू आहेत, याला चांगला प्रतिसादही मिळतो आहे. ■